**Maharashtra State Board of**
**Secondary & Higher Secondary Education, Pune**
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

**महाराष्ट्र राज्य**
**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे**
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 । EPABX -25705000 Fax : 25665807 । Secretary(P) : 25651750

तातडीचे/महत्वाचे
परीक्षा प्राधान्य

क्र.रा.मं./परीक्षा-७/3L2L
पुणे - ४११ ००४
दिनांक-३०/०६/२०२१

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा सन २०२१ साठी प्रविष्ठ विद्यार्थ्यांना त्यांचे बैठक क्रमांक अवगत करुन देण्याबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णय क्र.परीक्षा ०५२१/प्र.क्र.३९/एसडी-२ दि.१२/०५/२०२१ अन्वये कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे उदभवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा सन २०२१ रद्द करण्यात आली आहे. सदर विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र देण्यात आलेली नाहीत. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या मूल्यमापन कार्यपध्दतीबाबतचा तपशिल शासन निर्णय क्रमांक परीक्षा ०५२१/प्र.क्र.४३/एसडी-२ दि.२८.०५.२०२१ नुसार जाहीर करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना त्यांचे लॉग इन आयडी व युजर पासवर्डव्दारे सर्व विद्यार्थ्यांची बैठक क्रमांकनिहाय माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर विद्यार्थ्यांना पुढील परीक्षेची प्राथमिक तयारी करण्यासाठी त्यांचे बैठक क्रमांक अवगत करुन देण्यात यावेत व बैठक क्रमांकाची यादी शाळेच्या नोटीस बोर्डवर दर्शनी भागात चिकटवण्यात यावी. याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत आपल्या कार्यकक्षेतील सर्व शाळा/मुख्याध्यापक यांना सूचीत करण्यात यावे.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे - ०४